१०३२५

म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय वा० वा०
दा. क्र. १०३२५

वाङ्मय : ११

ग्रंथ संग्रहालय

# राजा विश्वामित्र

लेखक : महेश

ग्रंथप्रकाशक व ग्रंथविक्रेते
श्रीराम प्रकाशन
ठाकुरद्वार मुंबई क्रमांक २.

कान्यकुब्ज देशींचा राजा विश्वामित्र अतुल पराक्रमी होता. तत्कालीन सर्व राजांपेक्षां तो युद्धकलेंत श्रेष्ठ होता. सर्वजण त्याला वचकून असत.

वसिष्ठ मुनींकडे कामधेनु पाहून विश्वामित्राला कामधेनूचा लोभ सुटला. त्यानें कामधेनूची वसिष्ठ मुनींकडे मागणी केली. परंतु वसिष्ठांनीं ती कामधेनु त्याला देण्याला नकार दिला. ती कामधेनु साम, दाम, दंड सर्व उपायांनीं मिळविण्याचा त्यानें प्रयत्न केला. पण त्या प्रयत्नांत त्याचेच हात होरपळून निघाले. त्याची पूर्णतया फजिती झाली.

आलेल्या अपयशानें राजाच्या अभिमानाला धक्का बसला. त्याची सूडबुद्धि जागृत झाली. अन् त्या सूडबुद्धीनें त्याची महत्त्वाकांक्षा चेतावून त्याला सांगितलें, " राजा, कामधेनु मिळविण्यासाठीं, वसिष्ठांचा नक्षा उतरविण्यासाठीं, तुला वसिष्ठमुनींहून सामर्थ्यसंपन्न झालें पाहिजे. "

ह्याच सूडबुद्धीनें प्रेरित होऊन विश्वामित्रानें राज्याचा, सर्व सुखांचा, सर्व ऐश्वर्याचा त्याग केला. अन् तो सामर्थ्यसंपादनाच्या मार्गाला लागला. त्यासाठीं त्यानें खडतर तपश्चर्या केली.

थोडें सामर्थ्य वाढतांच त्यानें वसिष्ठांचा नक्षा उतरविण्याचा प्रयत्न केला. आपलें सामर्थ्य तोकडें असल्याचें त्याच्या प्रत्ययास आलें. पण आलेल्या अपयशानें तो नाउमेद झाला नाहीं, त्याचा उत्साह भंगला नाहीं. आपल्या ध्येयाच्या ध्रुवताऱ्यावरून आपली दृष्टि त्यानें किंचितही विचलित होऊं दिली नाहीं.

त्यानें पुन्हा पुन्हा तपश्चर्या केली. पुन्हा पुन्हा प्रयत्न केले. अन् याच रीतीनें सामर्थ्य संचय करता करतां तो ' ब्रह्मर्षि ' झाला.

ध्येयसिद्धीसाठीं सातत्यानें साधना करणाऱ्या प्रयत्नवादी मानवाचा —अखंड झगडणाऱ्या मानवाचा— राजा विश्वामित्र आदर्श आहे.

हेच विश्वामित्र ऋषि गायत्री मंत्राचे उद्गाते होत. एवढेंच नव्हे तर भगवान् रामचंद्रांना आणि लक्ष्मणाला शस्त्रास्त्रविद्येचे पाठ त्यांनींच दिले.

---

: प्रकाशक :
**सौ. शैलजा भावे,**
श्रीराम प्रकाशन,
ठाकुरद्वार, मुंबई २.

: मुद्रक :
**चिं. ग. वझे,**
साधना प्रेस,
२७४ शनवार, पुणें २

# राजा विश्वामित्र

## आश्रमांत

राजा विश्वामित्र तपोवनांत शिरला. गवताच्या हिरव्या हिरव्या मऊ मखमलीवर बागडणारीं हरिणशावकें राजाजवळ आलीं. राजाचे हात चाटूं लागलीं. गोजिरवाणीं वासरें त्याच्या अंगाला आपल्या माना घासूं लागलीं. इवलालीं सशाचीं पिलें पुटकन बिळांत पळालीं, अन् आपल्या भिरभिरणाऱ्या लालसर डोळ्यांनीं तेथूनच राजाकडे पाहूं लागलीं.

फारच गंमत वाटली राजाला. वासरांना खाजवीत अन् हरिणशावकांना कुरवाळीत, तो वसिष्ठ ऋषि बसले होते तेथें येऊन पोहोंचला.

"सुस्वागतम्, राजा, तुझें क्षेम असो!" वसिष्ठ मुनींनीं राजाचें स्वागत केलें. राजा आसनावर बसला. शिष्यांनीं पूजा-साहित्य आणलें. ऋषींनीं राजाची पूजा केली. आणि नंतर ते राजाजवळ गोष्टी करीत बसले.

कांहीं वेळानें राजा उठला. वसिष्ठांना वंदन करून तो म्हणाला, "तपोधन! येतों मी आतां. मला निरोप द्यावा."

"राजन्, आतां दुपार झाली आहे. थोडा आहार कर. अन् मग जा सावकाशपणें."

"मुनिवर! माझ्याबरोबरच्या माणसांना बाहेर ठेवून मी आश्रमांत आलों आहें. तीं माझी वाट पाहात असतील. अन् शिवाय त्यांचें जेवणही व्हावयाचें आहे."

" राजन् ! बोलाव त्यांना आश्रमांत. त्यांच्याही भोजनाची येथें व्यवस्था होईल."

" मुने ! पांचसातच माणसें असतीं तर आपल्या दर्शनासाठीं आणलें असतें त्यांना येथेंच. पण मी पृथ्वीप्रदक्षिणेसाठीं निघालों आहें. त्यामुळें माझ्याबरोबर माझा परिवार आहे. अन् थोडें सैन्यही आहे बरोबर."

" राजा, कांहीं हरकत नाहीं. कितीही सैनिक असूं देत. परमेशाच्या कृपेनें तुम्हां सर्वांची आश्रमांत नीट सोय होईल बरें ! "

'राजा गप्प बसला. हो ! बोलणार तरी काय पुढें ? मुनींनीं आपल्या शिष्यांना राजाच्या सैनिकांस बोलावण्यासाठीं पाठविलें.

सर्वजण तपोवनांत आले. त्यांनीं हातपाय धुतले. वसिष्ठमुनींच्या शिष्यांनी त्यांना भोजनासाठीं बसण्यास सांगितलें. गवताच्या गालिच्यावर सर्वजण नीट ओळीनें बसले.

सर्वजण बसले खरे. पण तेथें कशाचाच पत्ता दिसत नव्हता. त्यांना नीट बसवून वसिष्ठमुनींचे शिष्य बाजूला जाऊन स्वस्थ बसले होते. भोजनाची व्यवस्था करण्याचें कांहीं त्यांचें लक्षण दिसत नव्हतें. बरें, वसिष्ठ कांहीं करतात म्हणावें तर ते आपले गाईलाच बोलावीत होते.

राजासह सर्वजण बुचकळ्यांत पडले. एकमेकांच्या तोंडांकडे पाहूं लागले. जणूं कांहीं त्यांना म्हणावयाचें होतें कीं, इथें ना सांठवण ना कांहीं. वनांतील फळें अन् कंदमुळें गोळा करून जगतात. अन् लोकांना जेवायला बोलावतात. नको म्हटलें तरी ऐकत नाहींत.

बरें, कांहीं विरुद्ध बोलायची तरी सोय आहे ? हे पडले

विद्वान् अन् तपस्वी. यांच्याविरुद्ध बोलायचें म्हणजे कांहीं सोपें काम नव्हे.

पण यांना एवढा आग्रह करावयाची तरी काय जरूर ? सरळ परत निघालों असतों तर एव्हांना आपला मुक्काम देखील ठोकला असता एखाद्या जागीं. अन् जेवणदेखील करावयाला सुरुवात केली असती आपण.

याप्रमाणें ते विचार करीत होते. इतक्यांत ऊन ऊन अन्नाचीं ताटें त्यांच्या समोर आलीं. मग मात्र आपल्या मनांत आलेल्या विचारांबद्दल त्यांची त्यांनाच लाज वाटली.

पण त्यांना भुका लागल्या होत्या. सुंदर सुग्रास अन्न त्यांच्यापुढें होतें. त्यांनीं जेवणास सुरुवात केली. असें मधुर अन् रुचकर अन्न त्यांनीं यापूर्वीं कधींच खाल्लें नव्हतें. ते आकंठ जेवले. त्या भोजनानें सर्वजण संतुष्ट झाले.

पण राजाचें मात्र जेवणाकडे लक्ष नव्हतें. राहून राहून त्याला आश्चर्य वाटत होतें कीं, 'वसिष्ठ मुनींजवळ जेवण तयार करण्याची कसलीच सामग्री नाहीं, मग त्यांनीं जेवण तरी कसें तयार केलें ?'


☆

## कामधेनु

सर्वांचीं जेवणें झालीं. राजा अन् त्याचा परिवार परत निघाला. राजा वसिष्ठ मुनींजवळ गेला. त्यानें त्यांना वंदन केलें, अन् म्हणाला, "मुनिवर ! जातों मी आतां. आज माझें आपण

स्वागत केलें. मधुर अन् रुचकर भोजन घालून माझा अन् माझ्या परिवाराचा सत्कार केला. पण आपण एवढ्या माणसांसाठीं भोजनसामग्री तयार तरी कशी केली ?"

"राजा ! ही सामग्री ह्या 'शबले'नें तयार केली. ही कामधेनु आहे. जी जी इच्छा आपण करावी ती ती इच्छा ही पुरवते."



"मुनिवर, मग ही गाय मला द्या. माझ्यासारख्या सर्वश्रेष्ठ राजाकडे अशी गाय शोभून दिसेल."

" राजा ! ह्या गाईवरच आमचा आश्रम चालतो. आम्हां सर्वांना हीच पोसते. ही गाय तुला देऊन आम्हीं काय चरें करावें ? "

" पण मी ही गाय फुकट मुळींच मागत नाहीं. आपण ही गाय मला द्या, अन् या गाईच्या मोबदल्यांत मी आपणाला एक लक्ष गाई देतों. विपुल धन देतों."

" राजा ! तें धन तुझें तुलाच लखलाभ होवो ! मला तुझ्या धनाची वा तुझ्या गाइची बिलकुल आवश्यकता नाहीं. अन् माझी ही ' शबला ' मी तुला देणार नाहीं. "

" मुनिवर, मला ती गाय पाहिजे. मी येथील राजा आहें. आपण जर ती गाय दिलीत तर ठीकच आहे. नाहीं तर मला सैन्याच्या जोरावर ती येथून न्यावी लागेल. "

" राजा, तूं काय वाटेल तें कर ! खरें म्हणजे तूं आमचें रक्षण करावयाचें. पण तूंच जुलूम करूं लागलास. आमचें दुर्दैव अन् दुसरें काय ? पण मीही तुला निक्षून सांगतों कीं, मी कांहीं तुला ही गाय देणार नाहीं. "

" अस्सं काय ! ठीक आहे. चला रे या गाईला घेऊन. " राजानें सेवकांना आज्ञा दिली.

लगेच सेवकांनीं गाईला पकडलें. अन् निघाले ते. पण ते थोडें अंतर गेले नाहींत तोंच, गाईनें त्यांना एक जोराचा हिसका मारला. ती त्यांच्या हातांतून निसटली. अन् तेथून निघाली ती थेट वसिष्ठमुनींजवळ येऊन उभी राहिली.

" भगवन् , आपण कां रागावलां माझ्यावर ? माझ्या हातून आपला कांहीं अपराध घडला का ? कीं आपली कांहीं अवज्ञा झाली का ? "

" नाहीं, शबले, मी तुझ्यावर रागावलों नाहीं अन् तूं माझा अपराधही केला नाहींस. "

" भगवान् , मग आपण माझा त्याग कां केलात? मला राजाला कां देऊन टाकलीत ? "

" मीं तुझा त्याग केला नाहीं. हा उन्मत्त राजा माझ्या इच्छेविरुद्ध तुला ओढून नेत आहे. "

" भगवान् , मग आपण शिक्षा कां करीत नाहीं राजाला? त्याला शाप कां देत नाहीं ? "

" शबले, हा आपला राजा आहे. त्यामुळें हा मला अवध्य आहे. अन् शिवाय आज तो माझा पाहुणाही आहे. "

" भगवन् , आपण मला आज्ञा करा. आपल्या कृपेनें मी त्या दुष्टाचा गर्व नाहींसा करतें. "

" तुझें तूं संरक्षण कर. "

तोंपर्यंत राजाचे सैनिक तेथे आले होते. त्यांनीं पुन्हां शबलेला पकडलें. ते तिला घेऊन निघाले.

शबलेनें आपली शेपटी झटकली. शेपटीचे केस इतस्ततः उडाले. शबलेच्या एकेका केसापासून शेंकडों सैनिक उत्पन्न झाले. त्या सैनिकांनीं विश्वामित्राच्या सैन्यावर हल्ला चढविला. अन् वावटळीच्या वाऱ्यानें उडवून दिलेल्या पाचोळ्याप्रमाणें राजाच्या सैन्याची अगदीं वाताहत करून टाकली.

मोठ्या शिकस्तीनें— वा कामधेनूनें कृपा केली म्हणून— स्वतः विश्वामित्र अन् थोडेसे सैनिक तेथून आपला जीव बचावून पळाले.

★

## राजाला अस्त्रप्राप्ति

राजा राजवाड्यांत परत आला. पण झालेला पराभव, झालेला अपमान, फारच बोचत होता त्याला. तो खिन्न झाला होता.

अलीकडे राजा फारसा कोणाजवळ बोलत नसे. उदास झाला होता तो. वसिष्ठमुनींचा सूड कसा घेतां येईल, कामधेनु आपणाला कशी मिळेल, याच विचारांत तो सदा गुंग असे.

एक दिवस त्याच्या डोक्यांत कांहीं तरी विचार आला. लगेच त्यानें प्रधानाला बोलावून सांगितलें, " प्रधानजी, उद्यांपासून माझा मुलगा राज्यकारभार बघेल. मी हिमालयांत जात आहें."

" पण महाराज—"

" पण नाहीं नि कांहीं नाहीं. मला कांहींही विचारूं नका. मी सांगतों तशी व्यवस्था करा."

बिचारे प्रधानजी ! स्वस्थ बसले. राजाच्या हुकुमापुढें ते तरी काय करणार ? अन् प्रधानजीला सांगितल्याप्रमाणें राजा विश्वामित्र हिमालयांत निघून गेला.

हिमालयांत जाऊन विश्वामित्र तप करूं लागला. किती तरी काल लोटला. पण राजाची तपश्चर्या अखंड चालू होती. त्याच्या तपानें कैलासनाथ प्रसन्न झाले.

" राजा ! मी तुझ्यावर प्रसन्न झालों आहें. तुला पाहिजे तो वर मागून घे."

विश्वामित्राला आनंद झाला. त्यानें कैलासनाथाना साष्टांग नमस्कार घातला. अन् म्हणाला, " महादेवा ! देव, दानव अन् मानव यांना अवगत असणारीं सर्व अस्त्रें आपल्या कृपाप्रसादानें मला येवोत. "

"तथास्तु !" वर देऊन भगवान् अंतर्धान पावले.

राजाला आनंदाच्या उकळ्या फुटल्या. आनंदाच्या भरांत तो थयथय नाचूं लागला, महादेवाच्या कृपेनें आतां त्याला सर्व अस्त्रें येत होतीं.

विश्वामित्र गर्वानें फुगून गेला. सूडाच्या भावनेनें तो जुसता उसळूं लागला. वसिष्ठाचा आपण चुटकीसरसा नाश करूं असें त्याचें मन त्याला सांगूं लागलें. अन् कामधेनु आपल्या हातांतच आहे, असें त्याला वाटूं लागलें.

तो तेथून धावतच निघाला. वसिष्ठांच्या तपोवनाजवळ येऊन त्यानें एकामागून एक अस्त्रें सोडण्यास सुरुवात केली.

कांहीं कल्पना नसतांना अकस्मात् झालेल्या अस्त्रवर्षावानें सर्व-जण घाबरले. वाट फुटेल तिकडे धावत सुटले. एवढा गजबजलेला आश्रम — पण एका क्षणांत ओस पडला.

वसिष्ठमुनि बाहेर आले. "थांबा, थांबा, मी तुमचें विश्वा-मित्रापासून संरक्षण करतों," म्हणून सांगूं लागले.

पण वसिष्ठांचें ऐकायला होतेंच कोण तेथें ? सर्वजण मुळीं आधींच निघून गेले होते. तपोवनाचा विध्वंस झाला होता. सर्व उजाड झालें होतें.

वसिष्ठ रागावले. कधींही न चिडणारे वसिष्ठ चिडले. "दुष्टा, एवढ्या दिवसांच्या परिश्रमानें वाढलेल्या तपोवनाचा तूं नाश केलास. तूं मूर्ख आहेस. तूं दुराचारी आहेस."

"हं हं हं ! तपोवनाचा नाश केला काय ? आतां ? माझ्या अस्त्रांनीं तुझाच नाश करतों बघ."

"अस्सं ! एकूण महादेवांनीं दिलेल्या वरानें तूं उन्मत्त झाला आहेस. तुला वाटतें आहे कीं, आपल्याला मिळालेल्या अस्त्रांनीं आपण याचा नाश करूं. पण मूर्खा, तूं पाहाच माझें सामर्थ्य अन्

२९६९.९२

तुला कळूं दे कीं, क्षात्रबलापेक्षां ब्राह्मबल श्रेष्ठ आहे म्हणून.

डिवचलेल्या नागाप्रमाणें फूत्कार टाकून विश्वामित्रानें वसिष्ठांवर एकामागून एक अस्त्रें सोडलीं. पण वसिष्ठांच्या ब्रह्मदंडापुढें तीं लीन झालीं. त्यांचा वसिष्ठांवर प्रभाव चालेना.

आपल्या सर्व अस्त्रांचा नाश झालेला पाहून विश्वामित्र चिडला. त्यानें अखेरचें अमोघ अस्त्र सोडलें. ब्रह्मास्त्र त्याचें नांव. सगळें विश्व जाळण्याची शक्ति होती त्या अस्त्राची.

त्या अस्त्रानें पृथ्वी थरारली. त्रैलोक्य डळमळलें. देव, ऋषि अन् गंधर्व सर्वजण थरकांपले.

आतां वसिष्ठांचा नाश होणार — या कल्पनेनें विश्वामित्र मात्र रंगून गेला.

पण ब्रह्मदंडाच्या बलावर वसिष्ठांनीं तें ब्रह्मास्त्र ग्रासून टाकलें. ब्रह्मास्त्राचा ग्रास करीत असतांना त्यांच्या अंगांतून तेजाच्या ज्वाला निघूं लागल्या. त्या ज्वालांनीं त्रैलोक्याचा दाह होऊं लागला.

मग देवांनीं अन् ऋषींनीं वसिष्ठांची विनवणी केली, "ब्रह्मर्षि विश्वामित्राला आपण जिंकलें. त्याचें बल तें किती! आतां आपल्या तेजानेंच आपण हें तेज—ब्रह्मास्त्र—आवरून घ्या. आपण शांत व्हा. त्रैलोक्याचें रक्षण करा."

वसिष्ठमुनि शांत झाले. आपल्या सामर्थ्यानें त्यांनीं ब्रह्मास्त्र आवरून घेतलें.

विश्वामित्र! अगदीं खजील झाला होता तो. किती प्रयासानें त्यानें तीं अस्त्रें मिळविलीं होतीं! केवढे मनोरथ रचले होते त्यानें! त्या अस्त्रांच्या बलावर तो कामधेनु मिळवणार होता. तो वसिष्ठांचा सूड उगवणार होता. पण आतां काय? त्याचीं सर्व

अस्त्रें व्यर्थ ठरलीं होतीं. त्याचे मनोरथ धुळीला मिळाले होते.

विश्वामित्रांच्या डोक्यांत विचारांचा नुसता वणवा पेटला होता. 'धिक्कार असो ह्या क्षत्रियबलाला. ब्राह्मबल श्रेष्ठ आहे काय? असूं दे. कांहीं हरकत नाहीं. मी तप करीन. प्रचंड परिश्रम करीन. काय वाटेल तें करीन, पण ब्राह्मबल मिळवीन. वसिष्ठाचा नक्षा उतरवीन.'

विश्वामित्र तेथून निघाला तो दक्षिण दिशेला असणाऱ्या एका पर्वतावर गेला. तेथें त्यानें हजार वर्षं तप केलें.

त्या तपानें ब्रह्मदेव प्रसन्न झाले. "राजा, तूं सर्व राजांत श्रेष्ठ झालास. तूं 'राजर्षि' झालास." असें बोलून ते स्वर्गलोकीं निघून गेले.

पण विश्वामित्रांनीं ब्रह्मर्षिपद मिळविण्याचाच निर्धार केला होता. ते ब्रह्मर्षिपद मिळविण्याच्या निश्चयानें पुन्हा तपाला बसले.

☆

## राजा त्रिशंकु

राजा त्रिशंकु विचार करीत होता कीं, 'आपण सदेह स्वर्गाला गेलों तर काय बहार होईल? बस्स, आपण सदेह स्वर्गाला जाऊं या.'

राजाचाच विचार तो. लगेच त्यानें आपल्या कुलगुरूंना—वसिष्ठमुनींना—बोलावलें. वसिष्ठमुनि आले. राजानें त्यांची पूजा केली, अन् म्हणाला, "भगवन्, एक महायज्ञ करावयाचा आहे."

"कांहीं हरकत नाहीं. पण कशासाठीं करावयाचा आहे तो यज्ञ?"

" गुरुजी, सदेह स्वर्गाला जावें असें आहे माझ्या मनांत."

" राजन्, सोडून दे हा विचार तूं. अशक्य आहे ही गोष्ट. ह्या भानगडींत पडशील तर पस्तावशील मागाहून. बरें आहे. जातों मी आतां."

वसिष्ठ निघून गेले. त्यांनीं यज्ञ करण्याचें नाकारलें. पण राजा निराश झाला नाहीं. तो वसिष्ठ मुनींच्या मुलांकडे गेला. त्यांना त्यानें यज्ञ करण्याची विनंति केली.

" राजेंद्रा, येथें येण्याचे तूं उगाच श्रम घेतलेस. वसिष्ठांनीं सहज काम केलें असतें तुझें."

" मीं त्यांना तशी विनंति केली होती. पण ते म्हणाले, " असा यज्ञ करणें अशक्य आहे."

" ते नाहीं म्हणाले, मग आम्हीही हें काम करणार नाहीं. राजा, त्यांच्या अंगीं कोणताही यज्ञ करण्याचें सामर्थ्य आहे."

" मग तुम्हीही नाहीं म्हणतां तर? मी आतां दुसऱ्या कोणाकडून तरी यज्ञ करवीन. पण सदेह स्वर्गाला जाईन."

" राजा! राजा! तूं गुरुजींचा अपमान केला आहेस. तुला स्वर्ग तर मिळणार नाहींच. पण चांडाळ होशील तूं."

राजा खरोखरच चांडाळ झाला. त्याचें तेज गेलें. तो काळा पडला. त्याचे सुंदर केस आखूड झाले. राजवस्त्रें नाहींशीं होऊन विटकीं वस्त्रें आलीं त्या जागीं. सोन्याच्या दागिन्यांऐवजीं लोखंडाचे दागिने त्याच्या अंगावर आले.

पण राजाचा सदेह स्वर्गाला जाण्याचा हट्ट कायमच होता. तो तेथून विश्वामित्रांकडे आला. विश्वामित्र आतां ऋषि झाले होते. त्यांना वंदन करून राजानें सर्व हकीकत त्यांना सांगितली.

विश्वामित्रांनीं राजाला अभय दिलें, “ राजा, तूं भिऊं नको. मी तुझें रक्षण करतों. तुझ्यासाठीं याग करतों. यज्ञासाठीं ऋषींना बोलावतों. ते येतील. तुझा याग शेवटास जाईल. तूं सदेह स्वर्गाला जाशील. ”

विश्वामित्रांनीं यज्ञसामग्री गोळा करण्यास सुरुवात केली. अन् सर्व शिष्यांना बोलावून ते त्यांना म्हणाले, “ सर्व ऋषींना तुम्ही येथें बोलावून घेऊन या. वसिष्ठ मुनींच्या मुलांना देखील बोलावून आणा. ”

शिष्य निरनिराळ्या दिशांना गेले. सर्वांना बोलावून परत आले अन् विश्वामित्रांना म्हणाले, “ मुनिवर, सर्व ऋषि येत आहेत यागाला, पण वसिष्ठ मुनींचे पुत्र मात्र येत नाहींत. ते म्हणाले, ‘ वा ! छान, चांडाल यज्ञ करणार अन् त्याचा याजक क्षत्रिय, म्हणजे यज्ञाला येणाऱ्यांना स्वर्ग मिळायलाच नको मुळीं. ’ ”

विश्वामित्र रागावले. रागारागानें त्यांनीं वसिष्ठपुत्रांना शाप दिला. “ हे वसिष्ठपुत्र मला दोष लावीत आहेत त्याअर्थीं त्यांचें भस्म होईल. आजच्या आज त्यांना मृत्यु येईल. ”

विश्वामित्रांचें मन शांत झालें. त्यांनीं यागाला आरंभ केला. सर्व कर्में यथाशास्त्र पार पडलीं. नंतर विश्वामित्रांनीं हविर्भाग घेण्यासाठीं देवतांना बोलाविलें. पण देवता येतच ना !

विश्वामित्र चिडले. ‘ कांहीं हरकत नाहीं देवता आल्या नाहींत तर ! माझ्या तपःसामर्थ्यानें मी राजाला सदेह स्वर्गाला नेतों. ’ असा विचार करून ते म्हणाले, “ राजा, मीं जें तप केलें आहे त्या तपाच्या तेजानें तूं स्वर्गाला जा. ”

ते शब्द उच्चारतांच राजा सदेह स्वर्गाला जाऊं लागला. सर्व मुनींच्या देखत तो पाहतां पाहतां स्वर्गाला पोहोंचला देखील.

त्रिशंकु स्वर्गांत गेला खरा, पण देवांनीं त्याला ढकलून दिलें. ते म्हणाले, " त्रिशंकु, तूं पुन्हा खालीं जा. स्वर्गांत राहण्याची तुझी योग्यता नाहीं."



खालीं डोकें अन् वर पाय अशा स्थितींत त्रिशंकु खालीं येऊं लागला. खालीं येतांना तो आक्रोश करूं लागला.

विश्वामित्रांचें त्याच्याकडे लक्ष गेलें. " थांब, थांब, तूं तेथेंच

उभा राहा." त्यांनीं आज्ञा केली. त्यांच्या तपानें राजा तसाच लोंबकळत राहिला.

विश्वामित्र देवांवरही चिडले. त्यांनीं ठरविलें कीं, देव त्रिशंकूला स्वर्गांत जागा देत नाहींत म्हणजे काय? आपण नवीनच सृष्टि निर्माण करूं. अन् त्या सृष्टींतल्या होणाऱ्या स्वर्गांत त्रिशंकूला स्थान मिळवून देऊं.

विश्वामित्रांनीं आपल्या निश्चयाप्रमाणें प्रतिसृष्टि करण्यास आरंभ केला. त्यांचा हा खटाटोप पाहून देवांनीं त्यांची समजूत घातली. "हे विश्वामित्रा! राजा त्रिशंकूला गुरूचा शाप आहे. स्वर्गांत राहण्यास तो योग्य नाहीं. आतां तूं निर्माण केलेलीं नक्षत्रें त्रैलोक्य असेपर्यंत कायम राहतील. अन् राजा त्रिशंकु त्या नक्षत्रांत झळकत राहील."

विश्वामित्रांचें समाधान झालें. पण बिचारा राजा त्रिशंकु मात्र अधांतरींच लोंबकळत राहिला. ना धड पृथ्वीवर ना धड स्वर्गांत.

## कल्माषपाद राक्षस

राजा त्रिशंकूचा यज्ञ संपला. विश्वामित्र यज्ञकर्मांतून मोकळे झाले. राजाला स्वर्गांत पाठविण्याच्या खटाटोपांत त्यांचें पुष्कळच तप खर्चीं पडलें होतें. त्यांनीं पुन्हां तपश्चर्येला प्रारंभ करण्याचें ठरविलें.

ते तपश्चर्येसाठीं वनांत गेले. तेथें त्यांना कळलें कीं वसिष्ठ मुनींचे मुलगे अजून जिवंत आहेत. आपल्या शापानें त्यांना कांहींही अपाय झाला नाहीं. त्यांना आश्चर्य वाटलें. अन् ते संतापलेही.

छे! असें होतां कामा नये. वसिष्ठ मुनींचे मुलगे जिवंत असणें

म्हणजे आपल्याला लांछन आहे. जो तो म्हणेल, विश्वामित्राचा शाप फुकट गेला, त्याच्या अंगांत कांहींही सामर्थ्य नाहीं !

पण त्यांना मारावयाचें कसें ? त्यांचें तपसामर्थ्य आपल्या सामर्थ्याहून अधिक आहे. मग काय बरें करावें त्यांना मारण्यासाठीं ? ते विचार करूं लागले.

त्याच वेळीं एक राक्षस समोरून चालला होता. त्याच्याकडे त्यांचें लक्ष गेलें. त्यांना एक युक्ति सुचली. त्यांनीं त्याला बोलाविलें : " कल्माषपाद, इकडे ये जरा ! "

कल्माषपाद हें कांहीं त्या राक्षसाचें खरें नांव नव्हतें. अन् खरें म्हणजे तो मूळचा राक्षसही नव्हता. त्याचें नांव होतें मित्रसह राजा. पण वसिष्ठांच्या शापानें तो राक्षस झाला होता.

त्याचें असें झालें. एकदां मित्रसह राजा वनांत शिकारीला गेला होता. तेथें त्याला एक राक्षस दिसला. राजानें राक्षसाशीं युद्ध करून त्याला ठार मारलें.

कांहीं दिवसांनीं राजाकडे श्राद्ध निघालें. श्राद्धासाठीं राजानें वसिष्ठ ऋषींना जेवायला बोलाविलें.

त्याच वेळीं कांहीं कारणामुळें राजाचा आचारी आला नव्हता. अन् म्हणून राजानें एक नवीनच आचारी नेमला.

पण तो कांहीं आचारी नव्हता. तो होता राजानें मारलेल्या राक्षसाचा भाऊ. राजाचा सूड उगवायचा होता त्याला. मनुष्यरूप घेऊन तो राजाकडे आला. राजानें त्याला कांहीं ओळखलें नाहीं. तो फसला. त्यानें त्याची आचारी म्हणून नेमणूक केली.

त्या राक्षसानें आज संधि साधली. त्यानें वसिष्ठांच्या पानांत नरमांस वाढलें. अन् नंतर तेथून पोबारा केला.

सर्व धर्मकर्म उरकलें. सर्वजण जेवायला बसले. पानें वाढलीं गेलीं. स्वयंपाक तर मोठा छान दिसत होता. राजानें ऋषींना जेवायला बसण्याची विनंति केली.

आपल्या पानांत नरमांस वाढलें आहे ही गोष्ट ऋषींच्या लक्ष्यांत आली. त्यांना राग आला. संतापानें ते अगदीं लाललाल झाले, "राजा! मला बोलावून नरमांस जेवायला वाढलेंस? राक्षस होशील तूं. मनुष्यमांस भक्षण करशील." असा त्यांनीं त्याला शाप दिला.

राजाही रागावला. आपला कांहींच अपराध नसतांना मुनींनीं आपल्याला शाप दिला असें त्याला वाटलें. त्यानें हातांत पाणी घेतलें, मंत्र म्हटले, अन् तो वसिष्ठांना शाप देणार, इतक्यांत त्याची राणी त्याच्या आड आली अन् त्याला म्हणाली, "मुनींना शाप दिल्यानें आपली अधोगति होईल. तुम्ही त्यांना शाप देऊं नका. अन् शिवाय पाहा तर खरें, त्यांच्या पानांत खरोखरच नरमांस आहे."

राजा नीट निरखून पाहूं लागला. खरेंच! नरमांसच होतें कीं पानांतून! त्यानें आचाऱ्याला बोलावणें पाठविलें. पण आचारी केव्हांच पसार झाला होता.

ऋषींना वाईट वाटलें. "राजा, तूं बारा वर्षांनीं पुन्हा मनुष्य होशील." त्यांनीं राजाला उःशाप दिला.

राजानें हातांतील पाणी आपल्या पायांवर टाकलें. त्यामुळें त्याचे पाय काळे पडले, त्यांवर कोड उठलें, अन् त्याच वेळीं तो राक्षस झाला.

हाच तो कल्माषपाद राक्षस. विश्वामित्रांनीं त्याला बोलावतांच तो विश्वामित्रांजवळ गेला. विश्वामित्रांनीं त्याची विचारपूस केली.

अन् नंतर ते म्हणाले, " तूं सूड कां उगवीत नाहींस वसिष्ठ मुनींचा ? "

" पण वसिष्ठांचा मी कसा सूड उगवूं ? वसिष्ठ ब्रह्मर्षि आहेत. त्यांच्यापुढें माझा काय टिकाव लागणार आहे ? "

" अरे, पण त्यांना कोण कांहीं करायला सांगत आहे तुला ? तूं त्यांच्या मुलांना मारून खा म्हणजे झालें. "

राक्षसाला ही युक्ति पसंत पडली. राक्षस झाल्यामुळें त्याची बुद्धि पालटली होती.

तो वसिष्ठ ऋषींच्या आश्रमाकडे गेला. अन् एकामागून एक याप्रमाणें त्यानें वसिष्ठांचे शंभरही पुत्र खाऊन टाकले.

विश्वामित्रांची युक्ति बेमालूम साधली. या कानाचें त्या कानाला कळूं न देतां त्यांनीं आपल्या मार्गातील अडथळा दूर केला.

पण जरी लोकांना कळलें नाहीं तरी विश्वामित्रांचें मन त्यांना खात होतें. ह्या सर्व हत्या आपणच केल्या आहेत याची त्यांना जाणीव होती. ह्या हत्यांचें पातक आपल्याच माथीं बसल्यावांचून राहणार नाहीं याची त्यांना जाणीव होती.

आपलें काम झालें असें पाहतांच विश्वामित्र तेथून निघाले, अन् पापक्षालनासाठीं तपाला बसले.

★

## इंद्र घाबरला

विश्वामित्र पुष्कर तीर्थावर गेले. त्यांनीं तपस्या आरंभिली. त्या तपानें त्यांचें पाप धुवून निघालें. त्यांचें तेज वाढूं लागलें.

विश्वामित्रांचें तप पाहून इंद्र घाबरला. त्याला भीति वाटूं लागली. त्याला वाटूं लागलें कीं, विश्वामित्र जर आणखी

कांहीं काल असेंच तप करतील तर त्यांचें तेज खूपच वाढेल. इतकें वाढेल कीं ते आपल्याहून तेजस्वी होतील. अन् मग आपल्याला सिंहासनावरून खालीं उतरावें लागेल. विश्वामित्रांना देवेंद्राचा मान मिळेल.

छे! पण असें होऊन कसें चालेल? कांहीं तरी केलेंच पाहिजे आपलें आसन टिकविण्यासाठीं. त्यासाठीं विश्वामित्राचें तपावरून लक्ष उठवलें पाहिजे.

असा विचार करून इंद्रानें 'मेनका' नांवाच्या अप्सरेला बोलावणें पाठविलें. इंद्राच्या बोलावण्याप्रमाणें मेनका तेथें आली.

छानदार टपोरे डोळे होते तिचे. केस लांब अन् काळे भोर होते. कांति सुवर्णासारखी होती. अन् बांधा कसा अगदीं रेखीव होता. जणुं लावण्याची खाणच होती ती.

"भगवन्, काय आज्ञा आहे? कशासाठीं बोलावणं पाठविलं मला?"

"मेनके! विश्वामित्रमुनि पुष्कर तीर्थावर तप करीत आहेत. तेथें तूं जा. मुनींचें मन जिंकून घे. त्यांना तपावरून उठव. त्यांच्या तपांत खंड पाड."

देवेंद्राच्या आज्ञेप्रमाणें मेनका पृथ्वीवर आली. आपल्या मधुर आवाजांत तिनें गोड गीतें म्हणण्यास सुरुवात केली. अन् त्याचबरोबर ती नयनमनोहर नृत्यही करूं लागली. त्या मधुर गायनानें पशुपक्षी वेडावले अन् तिच्या पायांतील पैंजणांच्या तालावर सर्व अरण्य डोलूं लागलें.

त्या स्वर्गीय गाण्याचे सूर विश्वामित्रांच्या कानीं पडले. पैंजणांच्या छुमछुम आवाजानें त्यांची समाधि उतरली. त्यांनीं डोळे उघडले. समोर जणुं विद्युल्लताच नाचत आहे असा भास

झाला त्यांना. सौंदर्यदेवताच भूवर आली आहे असें त्यांना वाटलें. त्यांनीं पुन्हा समाधि लावण्याचा प्रयत्न केला. पण त्यांचे डोळे मिटेनात. त्यांचें मन एकाग्र होईना. त्यांना डोळ्यांसमोर मेनका दिसूं लागली. त्यांचें मन तिच्याभोवतीं घुटमळूं लागलें.

तें मोहक मुखकमल, तीं सुंदर नेत्रदलें, ती कनककाया, अन् तरलतेनें हलणारीं ती पदयुगुलें त्यांच्या डोळ्यांपुढून हलेनात कांहीं केल्या. त्यांना मेनकेनें भुरळ पाडली. ते तप विसरले. अन् तटस्थपणें तिच्याकडे पाहूं लागले.

विश्वामित्र भुलले ही गोष्ट मेनकेच्या लक्षांत आली. तिनें आपलें नृत्य थांबवलें. ती विश्वामित्रांजवळ आली. तिनें विश्वामित्रांना वंदन केलें.

"मुनिराज, माझ्या नृत्यगायनानें आपल्या ध्यानांत खंड तर पडला नाहीं ना? राग आला नाहीं ना माझा तुम्हांला?"

"छी! छी! मुळींच राग नाहीं आला तुझा मला. तुझ्या गायनानें माझं मन प्रसन्न झालं. तुझ्या नृत्यानें मला मोहिनी पडली."

"मुनिराज, आपण प्रसन्न झालां? खरोखर माझं नृत्यगायन आपणाला आवडलं? मी स्वतःला धन्य समजतें."

"मग येथेंच राहा ना तूं! माझ्याशीं लग्न कर. तुझ्या नृत्य-गायनानें मला प्रसन्न कर."

झालें! मेनकेचें काम झालें. विश्वामित्र मेनकेच्या जाळ्यांत सांपडले. मेनका खुदकन् हसली. तिनें संमति दिली.

त्यांचें लग्न झालें. त्यांचा संसार सुरू झाला. विश्वामित्राचें तपावरून लक्ष उडालें. मेनकेच्या मोहपाशांत ते गुरफटले. मेनकेच्या नृत्यगायनांत ते तल्लीन झाले. तिच्या नृत्यगायनांतच त्यांची समाधि लागली.

एकामागून एक कैक दिवस गेले. कालांतरानें मेनकेला एक सुंदर मुलगी झाली. मोठ्या आनंदानें तिनें ती मुलगी विश्वामित्रांना दाखविली.

विश्वामित्र चमकले. आपण संसारांत गुरफटल्याचें त्यांच्या लक्ष्यांत आलें. तपावरून आपलें लक्ष्य उडाल्याची त्यांना जाणीव झाली. त्यांना पश्चात्ताप झाला.

त्यांच्या डोळ्यांवर लाली चढली. त्यांनीं मेनकेकडे पाहिलें. आतां तिचें कांहींच आकर्षण वाटलें नाहीं त्यांना. आतां त्यांचें ध्येय त्यांच्या डोळ्यांसमोर त्यांना स्पष्ट दिसूं लागलें.

मेनका घाबरली. तिला वाटलें कीं, विश्वामित्र आपल्याला शापणार. वादळांत सांपडलेल्या लतेप्रमाणें ती थरथरां कांपूं लागली.

पण विश्वामित्रांचें तिच्याकडे मुळीं लक्ष्यच नव्हतें. ते स्वतःवरच चिडले होते. त्यांच्या मनांत प्रचंड वादळ उठलें होतें. त्यांच्या मनांत कांहीं तरी विचार आला. अन् ते एखाद्या पिसाटाप्रमाणें कुठें तरी निघून गेले.

☆

## राजा हरिश्चंद्र

आपलें काम झालें म्हणून मेनकाही निघून गेली. पण तिनें ती मुलगी तेथेंच ठेवली. पुढें शकुंतांनीं म्हणजे पक्ष्यांनीं तिचें रक्षण केलें. हिचेंच नांव ' शकुंतला '.

विश्वामित्र तेथून निघाले. त्यांनीं पुन्हा तपाला सुरुवात केली. हजारों वर्षें त्यांनीं अखंड तप केलें. त्यांच्या तपानें ब्रह्मदेव प्रसन्न होऊन म्हणाले, " विश्वामित्रा, तूं आतां सर्व ऋषींत श्रेष्ठ झालास. ' महर्षि ' झालास तूं आतां."

विश्वामित्र महर्षि झाले. आतां त्यांना सर्वत्र मान मिळूं लागला. सर्वत्र संचार करायला त्यांना मोकळीक होती. पण सर्वजण त्यांच्याहून वसिष्ठांनाच श्रेष्ठ मानीत. हें शल्य विश्वामित्रांना सारखें बोचत होतें.

एकदां ते देवसभेंत गेले होते. देवसभा चालू असतांना देवर्षि नारद तेथें आले. सर्वांनीं त्यांचें स्वागत केलें. इंद्रानें त्यांना आसन दिलें. अन् मृत्युलोकींची हकीकत विचारली.

“ देवेंद्रा, अयोध्या नगरींत सध्यां हरिश्चंद्र राजा राज्य करीत आहे. सर्व त्रैलोक्यांत त्याच्यासारखा सत्त्वशील, कर्तव्यतत्पर व सत्यवचनी राजा मला आढळला नाहीं. ”

नारदांनीं केलेली राजाची स्तुति ऐकून वसिष्ठमुनींना फार आनंद झाला. कारण ते होते त्या राजाचे गुरुजी. ते म्हणाले, “ नारदा, खरें आहे तुझें म्हणणें. राजा हरिश्चंद्र म्हणजे सत्त्वशीलपणाची मूर्तीच आहे खरोखर. ”

विश्वामित्र तेथें होते. त्यांनीं विचार केला कीं, छान संधि आहे ही. वसिष्ठांचा नक्षा उतरविण्यासाठीं आपण राजाची निंदा करूं. म्हणजे वसिष्ठ चिडतील.

ते म्हणाले, “ वसिष्ठ ऋषि, तुम्ही त्या हरिश्चंद्राची स्तुति करणारच. सूर्यवंशाचे पुरोहित ना तुम्ही ? पण मी त्या तुमच्या हरिश्चंद्राचें सत्त्व हरण करून दाखवितों ”

वसिष्ठ हसले. “ विश्वामित्रा, कशाला त्या भानगडींत पडतोंस. तो राजा कधींही सत्त्व सोडणार नाहीं. ”

“ अस्सं ! मग मी येथें असणाऱ्या सर्व लोकांच्या देखत प्रतिज्ञा करतों कीं, मी राजाची परीक्षा घेईन. अन् त्या परीक्षेंत राजा सत्त्वापासून ढळलाच पाहिजे. जर तो ढळला नाहीं तर

मी प्रतिसृष्टि निर्माण करण्यासाठीं केलेली साठ हजार वर्षांची तपश्चर्या त्याला अर्पण करीन."

झालें. पैज ठरली. देवसभा संपली, अन् विश्वामित्र आपल्या कार्याला लागले. त्यांनीं हरिश्चंद्राची सत्त्वपरीक्षा घेण्यासाठीं जाळें पसरण्यास सुरुवात केली.



एकदां हरिश्चंद्र झोपेंत असतांना विश्वामित्रांनीं त्याला एक स्वप्न पाडलें. अन् त्या स्वप्नांत हरिश्चंद्रानें आपलें सर्व राज्य एका ब्राह्मणाला दिलें असल्याचें पाहिलें. राजा दचकून जागा झाला.

अन् पाहतो तों स्वप्नांतील ब्राह्मण दत्त म्हणून पुढें उभा !

विश्वामित्रमुनि होते ते. ते म्हणाले, " हरिश्चंद्रा, काल स्वप्नांत तूं मला राज्य दान दिलेंस. त्या दानानें मी संतुष्ट झालों आहें. आतां तूं मला साडेतीन भार सुवर्ण दक्षिणा म्हणून दे. म्हणजे तुझ्या महादानाची सांगता होईल."

" आपण माझ्याबरोबर अयोध्येस चला. तेथें मी तुमची दक्षिणा तुम्हांला देईन. " राजा म्हणाला.

मग ते अयोध्येस गेले. राजा खजिन्यांतलें द्रव्य देऊं लागतांच विश्वामित्र म्हणाले, " राजा, आतां हें राज्य अन् हा खजिना माझा आहे. मला दक्षिणा देण्याची जर तुझी इच्छा असेल तर काशी क्षेत्रीं जाऊन स्वतःला विकून घे. "

राजा निघाला. त्याच्या बरोबर राणी तारामती अन् त्याचा मुलगा रोहिदास हीं देखील निघालीं. विश्वामित्रांनीं वाटेंत त्यांना खूप त्रास दिला. राजानें सर्व कांहीं सहन केलें.

शेवटीं राजा काशी क्षेत्रीं पोहोंचला. तेथें त्यानें स्वतःला गुलाम म्हणून विकून घेतलें. राणी तारामती अन् रोहिदास यांचाहि लिलाव करण्यांत आला. तींही गुलाम झालीं.

राजाला एका डोंबानें विकत घेतलें होतें. त्यानें त्याला स्मशानावर राखणदार नेमलें. तारामतीला अन् रोहिदासाला कौशिक नांवाच्या ब्राह्मणानें विकत घेतलें. त्याच्याकडे गेल्यावर तारामती स्वयंपाकाचें काम करूं लागली, अन् रोहिदास इतर कुमारांबरोबर शिकूं लागला.

एक दिवस विश्वामित्रांनीं सापाचें रूप घेऊन रोहिदासाला दंश केला. रोहिदास सर्पदंशानें मृत्यु पावला. तारामतीला

जिवापलीकडे दुःख झालें. ती त्याला अंत्यविधीसाठीं स्मशानांत घेऊन गेली.

आतां ती त्याला अग्नि देणार तोंच हरिश्चंद्र आला. त्यानें कराची मागणी केली. तारामती गुलाम. कर कोठून देणार ती? हरिश्चंद्रानें कर्तव्यनिष्ठुरतेनें दहनविधीला परवानगी नाकारली.

विचारी तारामती रोहिदासाचें प्रेत घेऊन तेथेंच रडत बसली. रडतां रडतां ती मूर्छित पडली. विश्वामित्रांनीं रोहिदासाचीं आंतडीं बाहेर काढलीं. तिच्या गळ्यांत घातलीं. तिच्या तोंडाला रक्त माखून ठेवलें. अन् लोकांना सांगितलें कीं, गांवाबाहेर एक लांव आली असून ती मुलें मारून खात आहे.

लोक खवळले. त्यांनीं तारामतीचा शिरच्छेद करण्यासाठीं राजाची अनुमति घेतली. अन् मग तिला वधस्तंभाकडे घेऊन गेले.

शिरच्छेद करण्याचें काम डोंबाकडे होतें. त्यानें हरिश्चंद्राला पाठवून दिलें. मारेकऱ्याचें काम करण्याचें हरिश्चंद्राच्या जिवावर आलें होतें.

पण आपलें कर्तव्य त्याच्या डोळ्यांसमोर दिसत होतें. तारामतीचा शिरच्छेद करण्याठीं राजानें तलवार वर उचलली. अन् तो आतां घाव घालणार तोंच भगवान् विष्णु प्रकट होऊन त्यांनीं राजाचा हात वरच्यावर धरला.

अन् कठोर सत्त्वपरीक्षेंत उत्तीर्ण झाल्याबद्दल राजाला धन्य म्हटलें.

विश्वामित्र पैज हरले. त्यांचे प्रयत्न फुकट गेले. त्यांनीं आपली तपश्चर्या राजाला दान केली.

## सरस्वती

विश्वामित्रांची प्रतिज्ञा व्यर्थ ठरली. वसिष्ठांचा नक्षा उतरविण्याचा त्यांचा हेतु साधला नाहीं. वसिष्ठांनींच पैज जिंकली. विश्वामित्रांचे मनोरथ हवेंतच विरले. त्यांचीं सुखस्वप्नें भंगलीं.

ते चिडले, चरफडले. आपल्या सर्वांगाची आग होत आहे असें त्यांना वाटूं लागलें. त्यांना चैन पडेना. त्यांना झोप येईना.

त्यांचें मन एकसारखें आक्रंदत होतें. एकसारखें ओरडत होतें, " तुला मानानं राहायचं असेल, तुला सर्वश्रेष्ठ व्हावयाचं असेल, तर हा वसिष्ठ मेला पाहिजे—वसिष्ठ मेला पाहिजे ! "

विचित्र मनःस्थितींत असत विश्वामित्र. रात्र रात्र त्यांचा डोळ्याला डोळा लागत नसे. एका रात्रीं त्यांना झोप आली नाहीं. ते पिसाळले होते जणूं. मग काय वाटलें त्यांना—ते नदीकांठीं गेले. अन् फेऱ्या घालूं लागले.

फेऱ्या घालतां घालतां त्यांच्या डोक्यांत एक कल्पना चमकली. ते थांबले. त्यांनीं हातपाय धुतले. आचमन करून सरस्वतीचें ध्यान केलें.

सरस्वती प्रकट झाली. ज्ञानदेवता तेथें आली. मूर्तिमंत मंगलता, मूर्तिमंत पावित्र्य विश्वामित्रांपुढें येऊन उभें राहिलें. सरस्वतीनें त्यांना वंदन केलें. " मुनिवर, काय आज्ञा आहे ? "

" आज्ञा ! सरस्वती, माझी आज्ञा ऐक. उद्यां वसिष्ठ सूर्याला अर्घ्य देण्यासाठीं,-वंदन करण्यासाठीं, तुझ्या पात्रांत उभा राहील, त्या वेळीं तूं एक मोठा लोंढा निर्माण करून त्याला येथें घेऊन ये. अन् मग मला हाक मार.

तो वसिष्ठ असा माझ्या समोर आला कीं, बस्स ! एकाच दगडांत काम करून टाकतों. "

सरस्वतीचा आपल्या कानांवर विश्वास बसेना. आपण काय ऐकत आहों हें तिला कळेना. ती थरथरां कांपूं लागली. तिनें बोलण्याचा प्रयत्न केला, " मुनिवर—"



पण विश्वामित्रांनीं तिला पुढें बोलूंच दिलें नाहीं.

" सरस्वती ! मी सांगतों तसेंच झालें पाहिजे. नाहीं तर

माझ्या क्रोधाग्नींत तुला करपटून जावें लागेल... समजलें... ना ? जा तर आतां."

विचारी सरस्वती ! तिचें शरीर, तिचें मन, तिच्या आधीन नव्हतें. विश्वामित्रांच्या आज्ञेप्रमाणें तीं प्रवाहांत शिरली. अन् प्रवाहाशीं एकरूप झाली.

कांहीं वेळानें ती भानावर आली. अन् विचार करूं लागली. तिच्यापुढें पेंच पडला : काय करावें ? विश्वामित्रांचें सांगणें ऐकावें तर शांतिब्रह्म वसिष्ठांच्या हत्येच्या पापांत सहभागी व्हावें लागतें. अन् न ऐकावें तर विश्वामित्र काय शाप देतील याची कल्पना देखील तिला करतां येत नव्हती.

किती तरी वेळ ती विचार करीत होती. कांहीं वेळानें तिला एक कल्पना सुचली. तिच्या मुखावर हसूं फुललें. मोठ्या आनंदानें तिनें एक समाधानाचा सुस्कारा टाकला.

दुसरा दिवस उजाडला. वसिष्ठमुनि सूर्याला अर्घ्य देत नदीच्या पाण्यांत उभे होते. एकाएकीं नदीचें पाणी वाढलें. वसिष्ठांचे पाय अलगद वर उचलले गेले. वसिष्ठ प्रवाहाबरोबर वाहत चालले. सरस्वती माता आपल्या बालकाला नाचवीत खेळवीत नेत होती जणूं.

विश्वामित्र नदीकांठीं उभे होते. नदीच्या प्रवाहांतून आवाज उठला : " मुने, वसिष्ठमुनींना तुमच्या आज्ञेप्रमाणें येथें आणलें आहे. आतां तुम्हांला काय करावयाचें तें करा."

विश्वामित्रांनीं वाहत येणाऱ्या वसिष्ठांकडे खुनशी नजरेनें पाहिलें. त्यांना क्रूर आनंद झाला. त्यांच्या मुखावर राक्षसी हसूं फुटलें. चिडलेल्या वाघाप्रमाणें त्यांनीं आपल्या सावजाकडे पाहून घेतलें.

वसिष्ठांना मारण्यासाठीं त्यांनीं एक जडशी शिळा आणून ठेवली होती. ती शिळा उचलण्यासाठीं ते खालीं वाकले. त्यांनीं शिळा उचलली अन् वसिष्ठांना मारण्यासाठीं ते पाहूं लागले. पण तेथें वसिष्ठ कुठें होते ?

त्यांनीं आजुबाजूला पाहिलें. सरस्वतीचा ओघ फारच वाढला होता. मोठ्या वेगानें वसिष्ठ त्यांच्यापासून दूर चालले होते. वसिष्ठ विश्वामित्रांच्या आटोक्याबाहेर गेले होते. त्यांना मारणें आतां शक्य नव्हतें. विश्वामित्रांचा बेत फसला होता.

☆

## ब्रह्मर्षि विश्वामित्र

विश्वामित्र सरस्वतीतीरावरून निघाले. त्यांच्या अंगाचा नुसता भडका उडाला होता. सरस्वतीनें फसविल्यामुळें ते चिडले होते.

बस्स ! ठरलें. आतां आपण स्वतःच या वसिष्ठाचा कांटा काढूं. आपला मार्ग निष्कंटक करूं. दुसऱ्यावर अवलंबून राहण्यांत कांहीं अर्थ नाहीं.

या वसिष्ठाला मारण्याखेरीज कांहीं इलाजच नाहीं दुसरा. मीं एवढें तप केलें. त्या तपानें इंद्रालाही भीति वाटली. पण तरीदेखील जेथें तेथें यालाच माझ्यापेक्षां श्रेष्ठ मानतात. अन् मला मात्र कमी लेखतात.

पण आतां आपण या थेरड्याला त्याच्या मुलांच्या भेटीला पाठवून देऊं. असा विचार करून ते वसिष्ठांना मारण्याची संधि शोधूं लागले. अन् त्याप्रमाणें लवकरच त्यांना एक संधि मिळालीही.

एक दिवस वसिष्ठ अन् अरुंधती आपल्या आश्रमाबाहेरील अंगणांत बोलत होतीं. विश्वामित्रांनीं त्यांना पाहिलें.

"वा! छान! आतां यांच्याजवळ कोणीही नाहीं. आतां यांना मारलें तर कोणीं मारलें हें कोणाला कळणार देखील नाहीं."

वसिष्ठ नाहींसा होईल अन् त्याचें खापर आपल्या माथीं फुटणार नाहीं. आपला संशय देखील येणार नाहीं कोणाला. त्याचा दोष—त्याचा लोकापवाद आपल्या अंगीं लागणार नाहीं.

वसिष्ठांचा घात करण्यासाठीं ते एक दगड शोधूं लागले. थोड्याच वेळानें त्यांना पाहिजे तसा दगड मिळाला. त्या दगडाकडे पाहून त्यांना समाधान वाटलें. बस्स! या दगडाचा एक एकच घाव पुरे कीं दोघेंही यमसदनाची वाट चालूं लागतील.

असा विचार करून त्यांनीं तो दगड उचलला अन् लपत-छपत ते वसिष्ठांच्या मागें येऊन उभे राहिले.

वसिष्ठांना कांहीं त्यांची चाहूल लागली नव्हती. अरुंधती त्यांच्याजवळ कांहीं तरी बोलत होती. विश्वामित्रांनीं विचार केला कीं, 'काय बोलत आहेत हीं? जरा ऐकूं या तरी! नाहीं तरी किती वेळ राहणार आहेत या जगतांत तीं आतां!'

"आज चांदणें किती स्वच्छ पडलें आहे नाहीं? अगदीं पिठासारखें शुभ्र दिसतें आहे."

"अरुंधती, काय उपमा दिलीस तूं? विश्वामित्राच्या तपा-सारखें चांदणें पडलें आहे म्हणायला हवें होतेंस तूं! त्यानें कठोर तप केलें आहे. त्याच्या तपाला तेज आहे."

विश्वामित्रांचा स्वतःच्या कानांवर विश्वास बसेना. त्यांची

सर्व शक्ति गेली ! त्यांचा हात ढिला पडला. त्यांच्या हातांतील दगड गळून पडला. जणूं द्वेष त्यांच्यापासून दूर गेला. जणूं त्यांच्या अंगीं असलेली क्रूरता गळून पडली.

धपकन् आवाज झाला. कसला आवाज झाला म्हणून वसिष्ठ पाहूं लागले. तोंच विश्वामित्र पुढें झाले. त्यांनीं वसिष्ठांचे पाय धरले.

" भगवन्, मी आपला अनंत अपराधी आहें. आपल्या पुत्रांचा मीं घात केला. आपल्यासारख्या थोर महात्म्याचा वध करण्याचा प्रयत्न केला.

" तो प्रयत्न साधला नाहीं म्हणून येथें आलों. मी स्वतः हें पाप आज करणार होतों. आपल्यासारख्या उदारात्म्यावर मी चांडाळ प्रहार करणार होतों.

" पण देवानें बुद्धि दिली. मीं तुमचें भाषण ऐकलें. अन् होणारा अनर्थ टळला. आतां तुम्ही मला शाप द्या. अन् हें जगांतील चालतें-बोलतें पाप नाहींसें करून टाका."

" ऊठ, विश्वामित्रा, ऊठ. तुला पश्चात्ताप झाला आहे. पश्चात्तापानें सर्व पापें जळून जातात. सर्वजण पावन होतात. तूंही पावन झाला आहेस. पश्चात्तापाच्या धगीनें तुझी तामसी वृत्ति जळून गेली आहे. पश्चात्तापाच्या आगीनें तुझी द्वेषबुद्धि नाहींशी झाली आहे.

" ऊठ, ब्रह्मर्षि विश्वामित्रा, ऊठ.' असें म्हणून वसिष्ठांनीं त्याला वर उचलून घेतलें.

अनुक्रम २५५८८
ग्रा. वा.
दिनांक १८६४
२-३-६१
१०३२५